


किशोरकुमार आणि मन्ना डे

शोलेमधलं एक हिट गीत- 'ये दोस्ती हम नही तोडेंगे...' कथेलाच अनुसरून होतं असं नाही तर, ते ज्यांनी गायलं त्या किशोरकुमार आणि मन्ना डे या गायकांनाही लागू पडतं. हे दोघं बंगालीबाबू एकमेकांच्या मैत्रीला आजन्म जागले. तसं पाह्यलं तर व्यावसायिक पातळीवर ते परस्परांचे प्रतिस्पर्धी होते. पण व्यावसायिक स्पर्धेतली इर्ष्या त्यांच्या निखळ मैत्रीला कधीच स्पर्शू शकली नाही. त्या दोघांच्या मैत्रीच्या स्मृतीला उजाळा देणारं हे छायाचित्र पाहून एकच प्रश्न पडतो, आजच्या काळातल्या गायकांत अशी मैत्री आढळेल?